# कर्करोगाबाबत महिलांनी सजग व्हावे

## डॉ. कोपीकर : 'कर्करोग निदान आपल्या दारी'चा कार्यक्रम

सकाळ वृत्तसेवा

पावस, ता. १७ : कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना त्याचा सामना करण्यासाठी महिलांनी सजग व्हावे आणि अन्य महिलांमध्ये जागृती निर्माण करावी, असे आवाहन जागतिक पातळीवर कॅन्सरवर काम करणारे तज्ज्ञ डॉ. चैतन्य कोपीकर यांनी केले आहे.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फौंडेशन, पुण्याचे प्रशांती कॅन्सर केअर मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरीत 'कर्करोग निदान आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. १७ ते २० डिसेंबर या कालावधीत गोळप व परिसरातील महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमाचे उद्घाटन आज चिरायु हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनीता चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

### फिनोलेक्स देणार मेमोग्राफी मशीन

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फौंडेशन यांच्या संयुक्त प्रयत्नातून चिरायु हॉस्पिटल येथे स्त्रियांच्या स्तनाच्या कर्करोगाचे निदान केंद्र सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत आणि यासाठी लागणारे मेमोग्राफी मशीन फिनोलेक्सतर्फे प्रदान करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाला डॉ. रमेश चव्हाण, रितू छाब्रिया उपस्थित होते. प्रशांती केअर मिशनच्या संचालिका ललिता गुर्जर आपले तज्ज्ञ डॉक्टर, समुपदेशक आणि अद्ययावत तपासणीची उपकरणे असलेली व्हॅन घेऊन शिबिरासाठी आले आहेत. सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत गोळप येथील फिनोलेक्स कॉलनीमध्ये तसेच पंचक्रोशीतील गावांमध्ये महिलांची तपासणी केली जाणार आहे.

कार्यक्रमात फिनोलेक्सच्या गोळप येथील कॉलनीच्या महिला मंडळाने महत्त्वाचा पुढाकार घेतला. यावेळी रझवी अन्सारी, डॉ. ज्योती चव्हाण, संचालक एस. एस. मठ, ए. बी. अत्रे, श्री. मालुसरे, डॉ. आशुतोष मुळ्ये, टी. के. काकडे, सागर निकटे, गौरी क्षीरसागर, अभिजित भाटवी आदी उपस्थित होते.



गोळप : फिनोलेक्स इंडस्ट्रीज, मुकुल माधव फौंडेशन, पुण्याचे प्रशांती कॅन्सर केअर मिशनतर्फे 'कर्करोग निदान आपल्या दारी' उपक्रमाचे मंगळवारी उद्घाटन करताना चिरायु हॉस्पिटलच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. सुनीता चव्हाण.